

# रंजन आणि विम्याशी त्याची गुप्त भेट

ग्राहक शिक्षण मालिका

(Marathi)

# अनुक्रमणिका

पान



| | |
|---|---|
| रंजनला विमा लोकायुक्तासंबंधी माहिती मिळते | 1 |
| रंजन मोटर विमा घेतात | 2 |
| रंजन यांना युलिपबद्दल अधिक माहिती मिळते | 3 |
| रंजनच्या लक्षात येते की प्रामाणिकपणा ही सर्वात चांगली पॉलिसी आहे | 4 |
| रंजनला कमी विमा काढण्यासंबंधी माहिती मिळते | 5 |
| रंजन आता त्याची आरोग्य विमा पॉलिसी पोर्ट करू शकतो | 6 |
| रंजनला फ्री लुक कालावधीची माहिती मिळते | 7 |
| रंजन प्रस्ताव प्रपत्र भरतो | 8 |
| रंजनला परवानाधारक मध्यस्थासंबंधी माहिती मिळते | 9 |
| रंजनला सर्वेयरची माहिती मिळते | 10 |
| रंजन आता तांत्रिक बाबतीत तज्ञ होतो | 11 |
| रंजनला कॅशलेस सेवेची माहिती मिळते | 12 |

Bima Bemisaal

## रंजनला विमा लोकायुक्तासंबंधी माहिती मिळते

रंजन 7 वर्षापासून त्याच्यासाठी आणि त्याच्या परिवारासाठी एक आरोग्य विमा पॉलिसी घेत आहे आणि त्याने एकही दावा केलेला नही. आता, रंजनचे वडिल, ज्यांचे वय 60 वर्ष असून ते निवृत्त पेन्शनर आहेत त्यांना मोतिबिंदूची शस्त्रक्रिया करून घ्यायची असते. त्याने थर्ड पार्टी ॲडमिनिस्ट्रेटरला केलेली कॅशलेस सुविधेची विनंती मान्य केली जाते परंतु रू.40,000 अंदाचे खर्चाच्या तुलनेत त्याला मिळणाऱ्या रकमेला रू.20,000 इतकी मर्यादा घातली जाते. ह्यात वाढ करून घेण्याचे रंजनचे प्रयत्न वाया जातात.



Bima Bemisaal

# रंजन मोटर विमा घेतात

रंजन हे सुरक्षित आणि कायद्याचे पालन करणारे ड्रायव्हर आहेत. आज सकाळी ते नेहमीप्रमाणे कामाला निघाले. कार्यालयात जाण्यासाठी ते उजवीकडे वळणार तेवढ्यात एका वेगाने येणाऱ्या बाईक ड्रायव्हरने लेन कट केली. रंजन यांच्या समयसूचकतेमुळे आणि सुदैवामुळे त्यांनी चटकन ब्रेक दाबला आणि मोठा अपघात टळला. काही विपरित घडले नाही यासाठी परमेश्वराचे आभार मानून त्यांनी कार्यालयात प्रवेश केला. त्याचवेळी त्यांच्या मनात एक विचार आला. रंजन यांना वाटले की जर अपघात झाला असता तर त्याचा खर्च त्यांनी कसा केला असता, जर काही झाले असते तर त्यांनी भरपाई कुठून दिली असती? त्यांची विम्याची पॉलिसी कुठे होती? ती वैध होती का? त्यांनी त्यांचे कागद तपासून पाहिले तेव्हा त्यांना मोटर विमा पॉलिसीचे कोणतेही दस्तऐवज सापडत नाहीत.















## रंजन यांना युलिपबद्दल अधिक माहिती मिळते

रंजन यांच्या असे लक्षात येते की त्यांना अलिकडेच आढळलेले एक घर खरेदी करण्यासाठी पैसे हवे आहे. ते त्यांची मालमत्ता तपासून पाहतात आणि त्यांच्या असे लक्षात येते की त्यांच्यापाशी × विमा कंपनीची एक युनिट लिंक्ड विमा पॉलिसी (युलिप) आहे. ते पॉलिसी सरंडर करून त्यांचे पैसे परत घेण्याचा विचार करतात. ते विमा कंपनीला पत्र लिहितात आणि त्यांच्याशी संपर्क देखील साधतात.






## रंजनच्या लक्षात येते की प्रामाणिकपणा ही सर्वात चांगली पॉलिसी आहे

रंजनच्या आईवडिलांचे वय वाढत आहे आणि त्यांच्या नेहमीच्या रुग्णालयाच्या खर्चाची त्याला चिंता वाटते. दरवर्षी वैद्यकीय खर्च हा त्यांच्या खर्चाचा मोठा भाग असतो. तो वैद्यकीय खर्चाची बिले कशी भरणार होता? रंजनने एक्सवायझेड कंपनीची लोकांना आरोग्य विमा पॉलिसी घेण्याची विनंती करणारी हीजाहिरात पाहिली. रंजन कंपनीशी संपर्क साधतो. विक्री कर्मचाऱ्यांना त्याच्या चौकशीचा स्वीकार करण्यास आनंद वाटतो आणि अजून एक पॉलिसी विकण्यास ते उत्सूक असतात.















Bima Bemisaal

## रंजनला कमी विमा काढण्यासंबंधी माहिती मिळते

रंजन आता स्वत: आणि स्वत:च्या कुटुंबाला विम्याचे संरक्षण देण्याच्या बाबतीत अधिकाधिक सूज्ञ बनत चालला आहे. मृत्यू, अपंगत्व आणि आजारपण ह्यासाठी पुरेसे संरक्षण घेतल्यानंतर, त्याचे घर आणि घरातील वस्तू, ज्या त्याने खूपकाटेकोर आखणी करून आणि बचत करून मिळविल्या आहेत त्या आग, पूर, जलप्रलय वगैरेपासून सुरक्षित राहतील याची काळजी घेण्याची त्याची इच्छा आहे. त्याच्या एजन्टला चांगले ज्ञान आहे आणि तो कार्यक्षम आहे आणि घरातल्या वस्तूंची काटेकोर यादी केल्यानंतर त्याच्या मालमत्तेचे मूल्यमापन करून घेण्याचा त्याला सल्ला देतो.







दुसऱ्याने आमिष दाखविल्यामुळे रंजन रागाने एजन्ट बदलतो जो चटकन कमिशन मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि रंजनला दीर्घकाळात कोणतीही सेवा देण्याची बांधिलकी डोळ्यासमोर ठेवत नाही. रंजन त्याचे घर आणि मालमत्ता यांचे मूल्य रू.15,00,000 असताना फक्त रू.5,00,000 चा विमा बाजार मूल्यानुसार काढतो. तांत्रिकदृष्ट्या पाहता मालमत्तेचे 2/3 इतक्या कमी मूल्याचा विमा उतरलेला असतो.

दुर्दैवाने रंजनच्या शहरावर निसर्गाचा घाला पडतो आणि एका दिवशी सकाळी संपूर्ण शहरात पूर येतो आणि सगळीकडे पाणीच पाणी होते.

रंजन श्री. एक्स (विमा एजन्ट) यांना कळवितो की त्याच्या घराची आणि घरातील मालाची खूप मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. अंदाज सुमारे रू.2 लाख आहे. विमा कंपनी चटकन आणि कार्यक्षमतेने नुकसानीचा आढावा घेते. नुकसानीचे मूल्यरू.1,50,000 ठरविण्यात येते. पण रंजनने ढोबळमानाने कमी किंमतीचा विमा काढलेला असल्यामुळे त्याला फक्त रू.50,000 रक्कम देऊ केली जाते. रंजनला झटका बसतो.




रंजनला अचानक मूळ एजन्टने त्याला काय सांगितले होते ते आठवते. त्याने त्याचा सल्ला ऐकला असता तर त्याला ह्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले नसते.



Bima Bemisaal

## रंजन आता त्याची आरोग्य विमा पॉलिसी पोर्ट करू शकतो

**रंजन एक्सवायझेड विमा कंपनीच्या आरोग्य विमा पॉलिसीमुळे नाराज असतो, पण पॉलिसीच्या अंतर्गत जमा झालेले सर्व क्रेडिट नष्ट होईल ह्या भीतीने तो तिला चिकटून राहतो. परंतु विमा कंपनीच्या अकार्यक्षमतेमुळे तो वैतागलेला असतो. तो एकदा संध्याकाळी चहा पिताना त्याचा मित्र मोहन याच्याकडे त्याची व्यथा व्यक्त करतो.**






# रंजनला फ्री लुक कालावधीची माहिती मिळते

एका रविवारी रंजन अभ्यास करत असताना त्याला एक्सवायझेड कंपनीचे न उघडलेले पाकिट मिळते. त्याने 6 महिन्यांपुर्वी खरेदी केलेली ती जीवन विमा पॉलिसी असते. ‘‘चांगली खरेदी आहे’’ त्याला वाटते. जेव्हा एजन्टने त्याला योजना समजावून सांगितली तेव्हा त्याला ती चांगली वाटली होती.

रंजन पॉलिसी बाहेर काढतो आणि ती पाहतो.त्याला झटका बसतो की एजन्टने त्याला जे समजावून सांगितले होते ती ही पॉलिसी नव्हती. ही अगदी वेगळी पॉलिसी होती, त्याला सांगितल्यापेक्षा जास्त कालावधीची होती आणि एजन्टने त्याला सांगितले होती की ती एकेरी प्रिमियमची आहे. दुसऱ्या दिवशी, पहिली गोष्ट रंजन काय करतो तर तो विमा कंपनीत जातो.














Bima Bemisaal
रंजन प्रस्ताव प्रपत्र भरतो
रंजन पाशी तीन जीवन विमा पॉलिसीज असतात आणि एक मोटर विमा पॉलिसी असते. त्याला आरोग्य विमा संरक्षणाचे महत्त्व पटते आणि तो एक्सवायझेड कंपनीच्या एजन्टकडे जातो. त्याला प्रस्ताव प्रपत्र भरण्यासाठी दिले जाते. रंजनला पुर्वी कधी प्रस्ताव प्रपत्र भरल्याचे आठवत देखील नाही. नेहमी त्याच्या एजन्टने त्याला मदत केलेली असते.
मला हे प्रपत्र वाचायला आणि काही भरायला वेळ नाही. कृपया तुम्ही माझ्यासाठी ते भरा. फक्त कुठे स्वाक्षरी करायची ते मला सांगा... फॉर्म भरायचा म्हणजे खूप त्रास असतो.
पण सर, तुम्ही प्रस्ताव प्रपत्र स्वत: भरले पाहिजे. तुम्ही यातील प्रश्न काळजीपूर्वक वाचले पाहिजेत आणि सर्व उत्तरे खरी दिली पाहिजेत.
हे बघा तुम्ही याची का जबरदस्ती करता मला माहित नाही... मला आतापर्यंत कोणीही त्रास दिला नाही... कदाचित मी पुर्वीच्या एजन्टशी संपर्क साधायला हवा होता.
सर, एक क्षणभर विचार करा, फक्त कल्पना करा की तुम्हाला जे हवे होते त्याऐवजी मी येथे दिलेल्या प्रश्नांची चुकीची उत्तरे दिली किंवा चुकीच्या ठिकाणी खुणा केल्या... तर जेव्हा दावा करावा लागेल तेव्हा तुमचेच नुकसान होणार नाही का? चुकीची माहिती देणे म्हणजे खोटी माहिती देणे आणि त्यामुळे तुमचा दावा रद्द होऊ शकतो. पण तुम्ही जेव्हा प्रपत्र भराल तेव्हा मी तुमच्याबरोबर बसून तुम्हाला मार्गदर्शन करू शकतो.
मला पहिल्यांदाच कोणीतरी असा सल्ला दिला आहे आणि तुमचा प्रामाणिकपणा आणि काळजी घेण्याची वृत्ती यांचे मी कौतूक करतो. धन्यवाद! मी नक्की प्रपत्र वाचतो आणि आताच ते भरतो.
रंजन प्रस्ताव प्रपत्र भरतो आणि त्याच्या असे लक्षात येते की एजन्टला तिथे विचारलेला तपशिल माहित असण्याची शक्यता नव्हती. तो त्याच्यापाशी असलेल्या सर्व पॉलिसीजची प्रस्ताव प्रपत्र तपासून पाहण्याचे ठरवितो. त्याठिकाणी प्रश्नांच्या दिलेल्या उत्तरांबद्दल त्याला चिंता वाटते.
लक्षात ठेवा, तुम्ही तुमचे विम्याचे प्रस्ताव प्रपत्र स्वत:च भरले पाहिजे.


Bima Bemisaal
रंजनला परवानाधारक मध्यस्थासंबंधी माहिती मिळते
रंजनला सुटीच्या दिवशी त्याचा मित्र मोहन भेटतो
हॅलो मोहन, तुला एक चांगली बातमी सांगायची आहे की एका व्यावसायिकाने आज मला फोन केला आणि मला हवी असलेली एक जीवन विमा पॉलिसी आणि त्याचबरोबर स्कॉलरशिपसारखे काही फायदे देण्याचे वचन दिले. मला हा प्रस्ताव चांगला वाटला आणि मी तो स्वीकारण्याचा विचार करत आहे.
कोणीतरी म्हणजे काय 'रंजन'? तो परवानाधारक एजन्ट किंवा ब्रोकर आहे का हे तू तपासून पाहिलेस का?
नाही, पण मला हवी ती पॉलिसी मिळत असेल आणि काही अधिक फायदे होत असतील तर ते महत्त्वाचे आहे का?
होय, ते खूप महत्त्वाचे आहे... कारण तुम्ही फक्त इन्शूरन्स रेग्यूलेटरी ॲण्ड डेव्हलपमेन्ट अथॉरिटी (आयआरडीए) ने परवाना दिलेल्या एजन्टस किंवा ब्रोकर्सबरोबरच व्यवहार केला पाहिजे आणि अजून विमा कायदा, 1938 च्या कलम 41 अंतर्गत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपाची कोणतीही सूट देणे हा गुन्हा आहे आणि त्या कायद्यानुसार अशी सूट स्वीकारणे देखील गुन्हा आहे. एक कायदे पाळणारा नागरिक या नात्याने आपण अशा गोष्टींना भूलता कामा नये.
मी तुझ्याशी सहमत आहे मोहन. मला खरच तोंडाला पाणी सुटले होते.
रंजन, तू मध्यस्थासंबंधी अधिक माहितीसाठी आयआरडीएच्या कंझ्युमर एज्युकेशन वेबसाईटला **www.policyholder.gov.in** येथे भेट दिलीच पाहिजे. ह्या वेबसाईटवर तुला विम्यासंबंधी अधिक माहिती देखील मिळू शकेल. पॉलिसीधारकांसाठी इंग्रजी, हिंदी आणि वेगवेगळ्या भारतीय भाषांमध्ये माहिती पुस्तिका देखील उपलब्ध आहेत.
माहिती दिल्याबद्दल धन्यवाद मोहन. मी नक्की वेबसाईट पाहीन.
फक्त परवानाधारक मध्यस्थांशी व्यवहार करा. फसव्या संपर्क साधणाऱ्या व्यक्तींपासून सावध रहा.


Bima Bemisaal
आई आर डी ए
irda
रंजनला सर्वेयरची माहिती मिळते
एकदा संध्याकाळी उशिरा सातत्याने वाढणाऱ्या ट्रॅफिकमध्ये रंजन वाट काढत होता एवढ्यात त्याला एक भयानक अनुभव येतो आणि एक लॉरी जंक्शनवर त्याच्या कारला पाठीमागून जोरात धडक देते. तो कसे तरी करून कार रस्त्याच्या कडेला करतो. सुदैवाने त्याच्या ग्लोव कंपार्टमेन्टमध्ये विमा कंपनीचा तपशिल असतो.
हॅलो सर, माझं नाव रंजन आणि माझ्यापाशी तुमच्या कंपनीची मोटर विमा पॉलिसी क्रमांक: 1234567 आहे. माझ्या कारचा रजिस्ट्रेशन क्रमांक एबीसी 1234 आहे आणि माझ्या कारला अपघात झाला आहे.
तुमची कार आता कोणत्या ठिकाणी आहे?
XYZ Insurance
मी रोड क्रमांक 5 वरच्या 4थ्या ट्रॅफिक जंक्शनवर आहे. मी सर्व्हिस सेन्टरला कार टोव करून नेण्याचा विचार करत आहे.
मी. रंजन मी तुम्हाला विनंती करतो की येथून कार हलवू नका. तुमची कार आणि नुकसानीची पाहणी करण्यासाठी एक सर्वेयर पाठवतो.
सर्वेयर? तो कोण असतो आणि तो ह्या संदर्भात काय करतो? मी फक्त तुमच्याशी व्यवहार करेन. मला कोणाही तिसऱ्या पक्षाशी व्यवहार करायचा नाही.
सर, विमा सर्वेयर ही अशी व्यक्ती असते जी वाहनाला किंवा विमा काढलेल्या इतर वस्तूंना झालेल्या नुकसानीचे मूल्यमापन करते. आम्ही नेमलेला सर्वेयर आमच्या वतीने तुमच्या कारचे सर्वेक्षण करेल आणि नुकसानीचा अंदाज करेल.
पण त्याची विश्वासार्हता काय आहे? तुम्ही तिसऱ्या पक्षाच्या अंदाजावर कसा विश्वास ठेवता? मला ह्या व्यवस्थेवर विश्वास वाटत नाही.
मी. रंजन मी तुम्हाला सांगू इच्छितो की इन्शूरन्स सर्वेयर हा परवानाधारक व्यावसायिक असतो ज्याला इन्शूरन्स रेग्यूलेटरी ॲण्ड डेव्हलपमेन्ट अथॉरिटी (आयआरडीए) ने सर्वसाधारण विमा व्यवसायासाठी सर्वेयर आणि नुकसानीचे मूल्यापन करणारी व्यक्ती म्हणून काम करण्यासाठी परवाना दिलेला असतो. तुम्ही ह्यावर विश्वास ठेवू शकता की आम्ही नेमलेला सर्वेयर हा आयआरडीएचा परवानाधारक आहे. मी तुम्हाला त्याचा संपर्काचा तपशिल देतो... त्याच्यापाशी आमच्या कंपनीचे नेमणूक पत्र असेल.
ओ, बरं, मग ठिक आहे, मी त्याची अपघाताच्या ठिकाणी वाट पाहतो. तुमच्या तात्काळ सेवेबद्दल धन्यवाद.
लक्षात ठेवा, इन्शूरन्स सर्वेयर्स हे व्यावसायिक असतात आणि त्यांच्यापाशी सर्वेयर आणि लॉस ॲसेसर्स म्हणून काम करण्यासाठी आयआरडीएचा परवाना असतो. (परवाना देणे, व्यावसायिक आवश्यकता आणि आचार संहिता) नियम, 2000.

## रंजन आता तांत्रिक बाबतीत तज्ञ होतो

रंजनला परदेशी कामानिमित्त जायचे असते आणि प्रवासाची आखणी करण्यात तो व्यग्र असतो. त्याची जाण्याची तारीख जशी जवळ येते तसे त्याचा चांगला मित्र मोहन त्याला त्याच्या प्रवास विमा योजनेबद्दल आठवण करून देतो. वेळ कमी असल्यामुळे रंजन वेबवरून पॉलिसीसाठी अर्ज करण्याचे ठरवितो.






Bima Bemisaal

# रंजनला कॅशलेस सेवेची माहिती मिळते

जीवनात आश्चर्याचे धक्के खूप असतात, कधीकधी ते वाईट असतात. कधीही मॉर्निंग वॉक न चुकविणारा माणूस, रंजनच्या कामावर असताना अचानक छातीत दुखू लागते. तो कार्डिओलॉजिस्टचा सल्ला घेतो ते अनेक ब्लॉक्स असल्यामुळे त्याला बाय-पास शस्त्रक्रिया करून घेण्याचा सल्ला देतात. तो मोहनला भेटायला जातो.













कॅशलेस सेवा ही विमा कंपनीद्वारा दिली जाणारी विशेष सुविधा आहे ज्यात त्या व्यक्तीला संबंधित रूग्णालयातून परत जाताना रूग्णालयाच्या खर्चाचे पैसे भरावे लागत नाहीत. ठराविक पद्धतींच्या अधीन राहून विमा कंपनीद्वारा थेट बिलाचे पैसे भरले जातात.
ओ ! मला माहिती दिल्याबद्दल धन्यवाद, पण ही पद्धती काय आहे?
तुमच्या टीपीएचा तपशिल त्यांनी दिलेल्या आयडी कार्डावर असतो. ताबडतोब टीपीएशी संपर्क साधा. तुमच्यापाशी आयडी कार्ड नसेल तर कधीकधी विमा कंपनी पॉलिसी क्रमांक आणि ओळखीसाठी पासपोर्ट/पॅन कार्ड/मतदार कार्ड ह्यानुसार कॅशलेस सुविधा देते. परंतु, तुम्हाला हे माहित असले पाहिजे की कॅशलेस सुविधा ही विमा कंपनीच्या/टीपीए नेटवर्कमधील रूग्णालयांमध्येच फक्त उपलब्ध असते. नेटवर्क रूग्णालये अशी असतात जी त्यांच्याशी कंत्राट करणाऱ्या ठराविक टीपीएसाठीच कॅशलेस सेवा देतात.
रंजन टीपीएशी संपर्क साधतो आणि त्याला माहिती मिळते की ते रूग्णालय नेटवर्क रूग्णालय आहे.
TPA
सेवा डेस्कशी संपर्क साधा आणि तुम्हाला दिलेल्या सल्यानुसार पद्धतींचा पाठपुरावा करा.
रंजन त्याची शस्त्रक्रिया यशस्वीपणे करून घेतो. मोहन त्याला भेटतो.
रंजन पुन्हा तू व्यवस्थित झालेला पाहून आनंद वाटला.
मोहन. आरोग्य विम्यातील कॅशलेस सेवेसंबंधी तू वेळेवर दिलेल्या सल्ल्याबद्दल मी तुझा आभारी आहे. पण, मला अजून एक शंका आहे. अचानक तातडीने रूग्णालयात दाखल करावे लागल्यास काय होते? त्या व्यक्तीपाशी टीपीएशी संपर्क साधण्या इतकी वेळ नसते, म्हणजे समजा अपघात झाला किंवा हृदयविकाराचा झटका आला वगैरे.
तुम्ही विमा काढलेल्या रूग्णाला रूग्णालयात तात्काळ घेऊन जाऊ शकता आणि त्याचे कुटुंबीय टीपीएशी संपर्क साधू शकतात किंवा रूग्णालयाच्या हेल्प डेस्कला टीपीएशी संपर्क साधण्यासाठी आणि कॅशलेससाठी मंजुरी मिळविण्यासाठी आयडी कार्डाचा तपशिल देऊ शकतात.
लक्षात ठेवा, बहुतेक आरोग्य विमा पॉलिसीज कॅशलेस सुविधा देऊ करतात. तुम्ही दस्तऐवज आणि त्यासाठी आवश्यक प्रक्रिया नीट समजून घ्या.

# ह्या मालिकेविषयी

तुम्हाला सर्वसाधारण माहिती देण्यासाठी ह्या मालिकेची आखणी विमा विनियामक आणि विकास प्रधिकारण (आयआरडीए) द्वारा करण्यात आली आहे. ह्या ठिकाणी देण्यात आलेली कोणतीही माहिती विमा पॉलिसीच्या नियम व अटींऐवजी किंवा त्यावर अधिक नाहीत. पॉलिसी संबंधी ठराविक माहितीसाठी किंवा कोणत्याही अधिक माहितीसाठी कृपया परवानाधारक एजन्ट किंवा ब्रोकरशी किंवा आयआरडीएकडे नोंदणी केलेल्या विमा कंपनीशी संपर्क साधा.

विमा विनियामक आणि विकास प्राधिकरण

आई आर डी ए

irda

INSURANCE REGULATORY AND DEVELOPMENT AUTHORITY

*विम्यास प्रोत्साहन, वित व्यक्तीस संरक्षण.*

**डिस्क्लेमर**

तुम्हाला अगदी संपूर्ण माहिती नव्हे तर सर्वसाधारण माहिती देणे हाच केवळ ह्या मालिकेचा उद्देश आहे. हा एक शैक्षणिक उपक्रम आहे आणि तुम्हाला कोणतीही कायदेशिर माहिती देणे हा याचा उद्देश नाही.

Designed by Mindset

विमा हा विनंतीचा विषय आहे.